नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ३ रे<br>Year - 3rd | अंक - १३<br>Issue - 13 | वार शुक्रवार दि. ३० मे २०२५<br>Blow- Friday Date 30 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

## महाराष्ट्र बनले परकीय गुंतवणूकदारांची पहिली पसंती

### २०२४-२५ मध्ये देशाच्या ४० टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राने पुन्हा एकदा परकीय गुंतवणुकीत देश पातळीवर आघाडी घेतली आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकूण १,६४,८७५ कोटी रुपयांची विक्रमी परकीय गुंतवणूक आकर्षित केली आहे. ही गुंतवणूक देशात आलेल्या एकूण ४,२१,९२९ कोटी रुपयांपैकी तब्बल ४० टक्के आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा महाराष्ट्रात ३२ टक्क्यांनी अधिक गुंतवणूक झाली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

गत आर्थिक वर्षात (जानेवारी ते मार्च २०२५) शेवटच्या तिमाहीत २५,४४१ कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्रात



आली आहे. हे वर्ष महाराष्ट्रासाठी विक्रमी ठरले असून, मागील १० वर्षांतील सर्वोच्च परकीय गुंतवणुकीचा नवा उच्चांक प्रस्थापित झाला आहे. विशेष म्हणजे, हा उच्चांक आर्थिक वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यांतच पार झाला असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या ऐतिहासिक आणि विक्रमी गुंतवणुकीवर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी म

**गतवर्षीच्या तुलनेत यंदा महाराष्ट्रात ३२ टक्क्यांनी अधिक गुंतवणूक**

हाराष्ट्रातील जनतेचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत आणि मंत्रिमंडळाच्या नेतृत्त्वाखाली राज्याची प्रगती अशीच सुरू राहील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला आहे.

**मागील दशकातील परकीय गुंतवणुकीचा आढावा (कोटी रुपयांमध्ये) :**

२०१५-१६ : ६१,४८२ कोटी
२०१६-१७ : १,३१,९८० कोटी
२०१७-१८ : ८६,२४४ कोटी
२०१८-१९ : ५७,१३९ कोटी
एप्रिल ते ऑक्टोबर २०१९ : २५,३१६ कोटी
२०२०-२१ : १,१९,७३४ कोटी
२०२१-२२ : १,१४,९६४ कोटी
२०२२-२३ : १,१८,४२२ कोटी
२०२३-२४ : १,२५,१०१ कोटी
२०२४-२५ : १,६४,८७५ कोटी

## मराठवाडा दुष्काळमुक्त करु; मुख्यमंत्र्यांची घोषणा, नदीजोड प्रकल्पाला पुढील महिन्यात सुरुवात

हिंगोली : नद्यांचे समुद्रात वाहून जाणारे पाणी नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून गोदा-वरी खोर्यात आणून मराठवाडा दुष्काळमुक्त करणार आहे. कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील पूराच्या अतिरिक्त पाण्याचा प्रश्न कालव्याच्या माध्यमातून पाणी मराठवाड्यात आणून सोडण्यासाठी जागतिक बँकेचे सहाय्य घेण्यात आले आहे. पुढील महिन्यात प्रकल्पावर काम सुरू होणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले.



हिंगोली जिल्ह्यातील २७१ कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या उपस्थितीत गुरुवारी पार पडला. या वेळी राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष आमदार हेमंत पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष गजानन घुगे, आमदार तान्हाजी मुटकुळे, रामराव वडकुते, बाबाराव बांगर, फुलाजी शिंदे, कैलास काबरा आदी उपस्थित होते. 'मराठवाडा दुष्काळमुक्त करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी नदी जोड प्रकल्पाद्वारे समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्यात आणले आहे. तसेच फ्लड डायव्हर्जन प्रकल्प राबविला जाणार असून पुराचे पाणी मराठवाड्यात आणले जाईल. त्यासाठी लवकरच निविदा काढली जाणार आहे,' असे फडणवीस म्हणाले.

हिंगोलीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला भारतरत्न नानाजी देशमुख यांचे नाव दिले जाईल. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी महोत्सवानिमित्त ज्योतिर्लिंग औंढा नागनाथ येथे आणि संत नामदेव महाराज यांचे जन्मस्थळ नर्सी नामदेव येथे विकासकामांसाठी निधी देण्याचे येईल, असे फडणवीस यांनी जाहीर केले. महिलांची सहकारी संस्था स्थापन करून बहिणींना मिळणार्या पैशातून कर्ज उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असे फडणवीस म्हणाले. पाकिस्तानचा व्हायरस डोक्यात शिरल्यामुळे काँग्रेसची मंडळी पाकिस्तानची भाषा बोलत असल्याची टीका फडणवीस यांनी केली. मेळाव्यात काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष दिलीप देसाई यांनी कार्यकर्त्यांसह भाजपत प्रवेश केला.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य अनमोल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी लोककल्याणकारी कार्यातून राज्यकारभार केला. संपूर्ण देशभरात त्यांनी मंदिरांची पुनर्निर्मिती व घाटांची बांधणी केली, त्यांनी तयार केलेल्या विहिरी, तलाव यांचे संवर्धन करण्याचे काम राज्य शासन करणार आहे. त्यांचे कार्य अनमोल असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दीनिमित्त सोशल स्टडीज फाऊंडेशन निर्मित लोकमाता अहिल्याबाई होळकर अन इटरनल फ्लेम या कॉफी टेबल बुकच्या प्रकाशन कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी केंद्रीय महिला व बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी, कौशल्य रोजगार उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान मंत्री ड. आशिष शेलार, मुंबई उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती तथा 'मॅट'च्या अध्यक्ष मृदुला भाटकर, कवी प्रसून जोशी, कॉफी टेबल बुकचे संपादक अम्बरिश मिश्रा, सत्यप्रकाश मिश्रा, अविनाश मुळे आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जन्मशताब्दी निमित्त त्यांच्या जन्मगावी चौंडी येथे मंत्रिमंडळ बैठक घेऊन राज्यातील प्रमुख ज्योतिर्लिंगांचे आणि पंढरपूरसारख्या देवस्थानांचे जीर्णोद्धार आराखडे मंजूर करण्यात आले. अहमदनगर जिल्ह्याचे 'अहिल्यानगर' असे नामकरण करण्यात आले आहे. अहिल्यादेवींच्या जीवनावर एक दर्जेदार व्यावसायिक चित्रपट तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या चित्रपटातून त्यांच्या शौर्याची आणि कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवता येईल.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्याविषयीची माहिती सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे. लोकांना त्यांच्या जीवना-तील काही पैलू माहिती असतीलही, पण त्यांच्या जीवनाचे बहुआयामी दर्शन हे लोकमाता अहिल्याबाई होळकर अन इटरनल फ्लेम या पुस्तकातून घडले, हे केवळ पुस्तक नसून आपल्या संस्कृतीचा ठेवा असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. केंद्रीय महिला व बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी म्हणाल्या, काशी, अयोध्या, सोमनाथसारख्या धार्मिक स्थळांच्या पुनर्विकासात अहिल्यादेवींचे ऐतिहासिक योगदानही आहे. 'इटरनल फ्लेम' या पुस्तकातून त्यांच्या नेतृत्वगुणांचा आढावा घेण्यात आला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन आपण पुढे जात आहोत. इतिहासात 'प्रगतीशील राणी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अहिल्यादेवींवरील हे पुस्तक त्यांच्या नेतृत्वगुणांवर भाष्य करते, असे त्यांनी यावेळी सांगितले.

## लोकांना क्रूर सरकार नको; पंतप्रधान मोदींची ममता बॅनर्जी यांच्यावर घणाघाती टीका

अलिपूरद्वार (प. बंगाल) : 'पश्चिम बंगालमधील नागरिक विविध संकटांमुळे त्रस्त असून येथील निर्मम सरकारला ते कंटाळले आहेत. लोकांना आता हे सरकार नकोसे झाले असून भाजपच्या विकासाच्या प्रारूपाची त्यांना प्रतीक्षा आहे,' अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी ममता बॅनर्जी सरकारवर घणाघाती टीका केली.



पंतप्रधानांच्या चार राज्यांच्या दौऱ्याला गुरुवारपासून सुरुवात झाली. सिक्कीम, बिहार, पश्चिम बंगाल व उत्तर प्रदेश या राज्यांचा या दोन दिवसीय दौऱ्यात समावेश आहे. पश्चिम बंगालमध्ये विकासकामांचे भूमिपूजन केल्यानंतर अलिपूरद्वार येथे आयोजित केलेल्या एका सभेत पंतप्रधानांनी सत्ताधारी तृणमूल काँग्रेस व ममता बॅनर्जी यांच्यावर चौफेर टीकास्त्र सोडले.

'बंगालमधील नागरिक हिंसा, भ्रष्टाचार, कायद्याचा अभाव आदी संकटांमुळे त्रासले-ले असून या क्रूर सरकारपासून सुटका करून घेण्यासाठी ते आसुसलेले आहेत. आम्ह-ाला आणखी क्रौर्य व भ्रष्टाचार नको आहे, असे नागरिक म्हणत आहेत. मुर्शिदाबाद व मालदा येथे सर्वसामान्य नागरिकांच्या बाबतीत घडलेल्या धार्मिक हिंसाचाराच्या घटना तृणमूल काँग्रेसच्या राजवटीच्या क्रौर्याचे व उदासीनतेचे नेहमी स्मरण करून देतील,' असे ते म्हणाले.

'या राज्यातील नागरिक सध्या अनेक संकटांमुळे त्रासलेले आहेत. राज्यात सर्वदूर पसरत असणारी हिंसा आणि कायद्याच्या अभावामुळे सामाजिक एकोप्याची वीण उसवली जात आहे. दुसरे संकट म्हणजे, सतत घडणाऱ्या भयंकर गुन्ह्यांमुळे राज्यातील माताभगिनींमध्ये असुरक्षिततेची भावना वाढीस लागली आहे. संधीचा अभाव व बेरोजगारीमुळे येथील तरुण निराशेच्या गर्तेत अडकले आहेत हे या राज्यापुढील तिसरे संकट आहे. भ्रष्टाचाराच्या व्याप्तीमुळे सर्वसामान्यांचा सरकारी व्यवस्थेवरील विश्वास ढळणे हे चौथे संकट असून राज्य सरकारच्या आत्मकेंद्रित राजकारणामुळे राज्यातील गोरगरीब अधिकारांपासून वंचित राहत आहेत, हे येथील पाचवे संकट आहे,' अशा शब्दांत त्यांनी तृणमूल सरकारला लक्ष्य केले.

पंतप्रधानांनी यावेळी शिक्षक भरती घोटाळ्याचा उल्लेख केला. 'भ्रष्टाचार व अनियमिततेतून राज्य सरकार हजारो शिक्षक व त्यांच्या कुटुंबीयांचे भविष्य उद्ध्वस्त करत आहेत. यामुळे पूर्ण शिक्षणव्यवस्थाच रसातळाला जात आहे. शिक्षक भरती घोटाळ्यातील आपल्या चुका मान्य करण्याऐवजी ममतांचे सरकार न्यायव्यवस्थेला दोषी ठरवत आहेत,' असे पंतप्रधान म्हणा-ले.

**विविध प्रकल्पांचे भूमिपूजन**

अलिपूरद्वार : पंतप्रधानांच्या हस्ते येथे १,०१० कोटी रुपये खर्चाच्या शहर वायू वितरण (सीजीडी) प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. या प्रकल्पामुळे अलिपूरद्वार व शेजारच्या कूचबिहार जिल्ह्यातील अडीच लाख घरांना पाइपद्वारे गॅसपुरवठा होणार आहे. भारताचे विकसित राष्ट्रात रूपांतर होण्यासाठी पश्चिम बंगालचा विकास होणेही आवश्यक आहे, असे पंतप्रधान यावेळी म्हणाले. पश्चिम बंगालमध्ये दाखल होण्यापूर्वी सिक्कीम व बिहार येथेही काही विकासकामांचे पंतप्रधानांच्या हस्ते भूमिपूजन व उद्घाटन झाले.

**ममतांचे पंतप्रधानांना प्रत्युत्तर**

कोलकाता : 'काही राज्यांतील आगामी निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून पंतप्रधान मोदी ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून राजकीय लाभ घेण्याचा प्रयत्न करत आहेत,' असा आरोप ममता बॅनर्जी यांनी केला. 'जगा-तील अनेक देशांत ऑपरेशन सिंदूर बाबतची भूमिका मांडण्यासाठी भारताची सर्वपक्षीय शिष्टमंडळे रवाना झालेली असताना पंतप्रधानांनी इथे येऊन या राज्यावर टीका करणे निराशाजनक आहे, असेही त्या म्हणाल्या.

## वैष्णवी हगवणे प्रकरण; सरकारकडून कसपटे कुटुंबियांची 'ही' मागणी मान्य

पुणे : वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात मोठी बातमी समोर आली आहे. राज्य सरकारने वैष्णवी हगवणे हिचे वडील अनिल कसपटे आणि त्यांच्या कुटुंबियांची मागणी मान्य केली आहे. राज्य सरकारने वैष्णवी हगवणे प्रकरणात कोर्टात बाजू मांडण्यासाठी ज्येष्ठ सरकारी वकील आर. आर. कावेडिया यांची नियुक्ती केली आहे. अनिल कसपटे यांनी माध्यमांसमोर याबाबतची मागणी केली होती. त्यांच्या या मागणीनंतर सरकारने लगेच याबाबत निर्णय घेतला आहे. राज्य सरकारकडून आज लगेच याबाबत अधिकृत आदेश जारी करण्यात आला आहे.

कसपटे कुटुंबियांनी गुन्ह्या-ची प्रभावी आणि निष्पक्षप-णे न्यायालयात मांडणी व्ह-ावी, यासाठी सहायक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी अभियोक्ता म्हणून आर. आर. कावेडिया यांची नियुक्ती करण्याची मागणी केली होती. सहायक संचालक आणि सरकारी अभियोक्ता एस. व्ही. मोरे देसाई यांनी गुरुवारी अधिकृत आदेश जारी करून कावेडिया यांची या प्रकरणात सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे.

**वारीत सहभागी होणाऱ्या वाहनांना मिळणार टोल माफी**


**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून वारकऱ्यांना दिलासा**

## वारकऱ्यांना मिळणार विम्याचा लाभ; याहीवर्षी वैद्यकीय सुविधा पुरवणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आषाढी वारीनिमित्त वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी त्यांचा समूह विमा काढण्यात येईल, तसेच त्यांना दरव-र्षीप्रमाणे यावर्षीही वैद्यकीय सेवा पुरवण्यात येतील, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. आषाढी वारीनिमित्त केलेल्या उपाययोजना आणि वारकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काल सह्याद्री अतिथीगृहात विशेष बैठक पार पडली होती. त्याविषयीची अधिक माहिती प्रसार माध्यमांना देतांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.

नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे वारी मार्ग कुठेही खराब झाला असल्यास मुरूम, खडी आणि डांबरीकरण करून त्याची तातडीने डागडुजी करावी, वारकऱ्यांना मुबलक पाणी, विजेची जोडणी, पा-लखी तळावर वॉटरप्रूफ तंबू उप-लब्ध करून घ्यावे तसेच वारीसाठी जाणाऱ्या गाड्यांना दरवर्षीप्रमाणे टोल मध्ये सवलत दिली जाईल, असेही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.





**आरोग्य तपासणी**

गतवर्षीप्रमाणे याहीव-र्षी आषाढी वारीनिमित्त राज्याच्या आरोग्य विभागाकडून भव्य आरोग्य शिबिरे आयोजित केली जा-तील, वारकऱ्यांसाठी कार्डीएक रुग्णवाहिकेची सोय उपलब्ध करून दिली जाईल, पंढरपुरात तात्पुरती आयसीयू सुविधा उपलब्ध करून दिली जाईल, या सर्व सोयी उप-लब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्वतः पंढरपूरला जाऊन आढावा घ्यावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी यावेळी त्यांना दिले. तसेच प्रत्येक जिल्ह्यातून निघणाऱ्या मोठ्या दिंड्यांना वारीच्या काळात पूर्णवेळ सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करून द्यावी, असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**नोडल अधिकारी नेमणार**

यासोबतच गतवर्षी वारीदरम्यान झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या वारकऱ्यांना शासनाद्वारे मदत केली जाईल, पोलिसांशी व्यवस्थित समन्वय व्हावा यासाठी नोडल ऑफिसर नेमण्यात येईल. वारकऱ्यांचे भोजन आणि इतर प्रथा परंपरा वेळच्या वेळी पार पाडाव्यात यासाठी वारी कुठे जास्त वेळ खोळंबणार नाही यासाठी प्रयत्न केला जाईल, यंदाची वारीही स्वच्छ वारी, निर्मल वारी, हरित वारी म्हणून आपल्याला पार पाडायची असल्याने त्यासाठी लागेल ते सर्व सहकार्य शासनाकडून केले जाईल, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

## संपादकीय....

# राज्याचा नवा उच्चांक

गत आर्थिक वर्षात (जानेवारी ते मार्च २०२५) शेवटच्या तिमाहीत २५,४४१ कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. हे वर्ष महाराष्ट्रासाठी विक्रमी ठरले असून, मागील १० वर्षांतील सर्वोच्च परकीय गुंतवणुकीचा नवा उच्चांक प्रस्थापित झाला आहे. रिझर्व बँकेने देशातल्या प्रत्येक राज्यात आलेल्या परकीय गुंतवणुकीचे आकडे जाहीर केले आहेत आणि यामध्ये महाराष्ट्र हा पहिल्या नंबरवर आलेला आहे. नुसत्या पहिल्या नंबरवर नाही तर देशामध्ये जेवढी गुंतवणूक आलेली आहे त्या सगळ्या गुंतवणुकी पैकी ४०% गुंतवणुक एकट्या महाराष्ट्रात आली आहे. इतर सगळे राज्य ६०% मध्ये आहेत आणि एकटा महाराष्ट्रात ४० टक्के गुंतवणूक आली आहे. एवढेच नाही आपल्या नंतरची जी राज्य आहेत कर्नाटक, दिल्ली, गुजरात या सगळ्या राज्याची गुंतवणुकीची बेरीज केली असता त्याच्यापेक्षा जास्त गुंतवणूक महाराष्ट्रात आलेले आहे. म्हणजे डबल इंजिनच्या सरकारवर जगातल्या गुंतवणूकदारांनी पहिली पसंदी दिली आहे . येणाऱ्या काळात बाराशे प्रकारच्या सेवा व्हाट्सअपवर उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या योजनांसाठीचा अर्ज देखील व्हाट्सअपवर भरावे लागणार आहेत तसेच या अर्जासाठी लागणारे शुल्क देखील व्हाट्सअप च माध्यमातूनच घेतले जाणार आहे. ती प्रमाणपत्रे व्हाट्सअपवर मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले येणाऱ्या पारदर्शक सेवा सर्वसामान्य नागरिकांना दिला जाणार आहे, त्याचबरोबर या सेवा सहज उपलब्ध होईल यासाठीच हा निर्णय घेतला गेला आहे.

# एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान; काढणीपश्चात व्यवस्थापनासाठी अर्थसहाय्य योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर दि.२८ (जिमाका):- राज्याच्या कृषी उत्पादनात फलोत्पादन पिकांचा महत्वाचा वाटा आहे. फलोत्पादन पिकांचे मुल्यवर्धन प्रक्रिया करून शीतगृहांमध्ये साठवणूक करून फलोत्पादन पिकांचे पदार्थ वर्षभर सर्व हंगामात उपलब्ध होऊ शकतात. यासाठी काढणीपश्चात व्यवस्थापन कार्यक्रम, पणन सुविधा व प्रक्रिया प्रकल्प उभारणीसाठी शासनाकाडून अर्थसहाय्य देण्यात येते काढणीपश्चात व्यवस्थापन कार्यक्रम पणन सुविधा व प्रक्रियांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध घटकांचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर https://mahadbt.maharashrta.gov.in या संकेतस्थळावर फलोउत्पादन या घटकाखाली अर्ज करावेत असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे

सोलापूर जिल्ह्यात प्राथमिक प्रक्रिया केंद्र, एकात्मिक शीतसाखळी प्रकल्प व कांदाचाळ या घटकांसाठी लक्षांक प्राप्त झालेला आहे. एकात्मिक काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत प्राथमिक प्रक्रिया केंद्र या घटकासाठी (एमआयडीएच योजनेच्या इतर घटकांसोबत जोडलेला असावा.) खर्च मर्यादा रुपये ३५ लाख प्रति युनिट असून, अनुदान मर्यादा ग्राह्य भांडवली खर्चाच्या सर्वसाधारण क्षेत्रासाठी ३५ टक्के व कमाल रुपये १२ लाख २५ हजार आणि अनुसूचित क्षेत्रासाठी ५० टक्के व कमाल रुपये १७ लाख ५० हजार बँक कर्जाशी निगडीत असेल. तसेच एकात्मिक शीतसाखळी प्रकल्पासाठी खर्च मर्यादा रुपये १० कोटी प्रति प्रकल्प, ग्राह्य भांडवली खर्चाच्या सर्वसाधारण क्षेत्रासाठी ३५ टक्के व कमाल रुपये ३ कोटी ५० लाख आणि अनुसूचित क्षेत्रासाठी ५० टक्के व कमाल रुपये ५ कोटी बँक कर्जाशी निगडीत आहे.

प्राथमिक प्रक्रिया केंद्र व एकात्मिक शीतसाखळी प्रकल्प योजनेसाठी घटकांसाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादनक गट, भागीदारी संस्था, मालकी संस्था, नोंदणीकृत स्वयंसहायता गट नोंदणीकृत उत्पादक संघ (ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील) शेतकरी उत्पादक कंपनी, महानगरपालिका, सहकारी संस्था, सहकारी मार्केटिंग फेडरेशन, लोकल बॉडी, कृषि उत्पन्न बाजार समिती, पणन मंडळ, शासकीय विभाग, ग्रामपंचायत पात्र आहे.




तसेच ५, १०, १५, २० व २५ मेट्रीक टन कांदाचाळीसाठी १० हजार प्रति मेट्रीक टन खर्च मर्यादेसाठी, ५ हजार प्रति मेट्रीक टन अनुदान मर्यादा आहे. २५ ते ५०० मेट्रीक टन कांदाचाळीसाठी ८ हजार प्रति मेट्रीक टन खर्च मर्यादेसाठी ४ हजार प्रति मेट्रीक टन अनुदान मर्यादा आहे. ५०० ते १००० मेट्रीक टन कांदाचाळीसाठी ६ हजार प्रति मेट्रीक टन खर्च मर्यादेसाठी ३ हजार प्रति मेट्रीक टन अनुदान मर्यादा आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे स्वत:च्या मालकीची जमीण असणे आवश्यक व ७/१२ उताऱ्यावर, स्वत:चे कांदा पिक असणे आवश्यक सदर योजनेचा लाभ वैयक्तीक कांदा उत्पादक शेतकरी, शेतकऱ्यांचा गट, स्वयंसहाय्यता गट, शेतकरी महिला गट, शेतकऱ्यांचे उत्पादक संघ, नोंदणीकृत शेतीसबंधी संस्था, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था व सहकारी पणन संघ यांना घेता येईल.

योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.



# शाळांमध्ये माजी सैनिकांकडून प्रशिक्षण राष्ट्रनिर्मितीचे सशक्त पाऊल : शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत 'आनंददायी शनिवार' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात स्वयंसेवी पद्धतीने काम करणाऱ्या माजी सैनिकांच्या अनुभवातून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याच्या निर्णयामुळे शिस्त, देशभक्ती, नेतृत्वगुण आणि समाजसेवेचे उत्तम उदाहरण असलेल्या माजी सैनिकांचे प्रशिक्षण आता थेट विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार असल्याने राष्ट्रनिर्मितीचे हे सशक्त पाऊल ठरेल, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.

माजी सैनिकांमार्फत शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याबाबत मंत्रालयातील दालनात आढावा बैठक झाली. यावेळी पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री शंभुराज देसाई, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, माजी सैनिक कल्याण विभागाचे सचिव पंकज कुमार, सैनिक कल्याण विभागाचे सचिव कर्नल दीपक ठोंगे, उपसचिव चंद्रकांत मोरे, समीर सावंत, अप्पासिंग राजपूत, लेफ्टनंट कर्नल सतेश हंगे, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे अवर सचिव अनिरुद्ध कुलकर्णी उपस्थित होते. शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार हे दुरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे म्हणाले की, राज्यात दरवर्षी जवळपास पाच हजार सैनिक सेवानिवृत्त होतात. त्यातील प्रत्येक जिल्ह्यातील स्वयंसेवी पद्धतीने काम करणाऱ्या निवडक आणि गुणवत्तापूर्ण माजी सैनिकांची यादी तयार करून हा उपक्रम कशा पद्धतीने राबविता येईल याविषयीचे सविस्तर नियोजन करण्यात येणार आहे. यामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील विद्यार्थ्यांना सैनिकी जीवनाची मूलभूत ओळख होणार आहे. या उपक्रमाद्वारे शाळांमध्ये कवायती, शारीरिक प्रशिक्षण, ऐतिहासिक सहली, युद्ध संग्रहालयांना भेटी, प्रेरणादायी व्याख्याने व चित्रफिती यांसारखे उपक्रम प्रभावीपणे राबविले जाणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, राष्ट्रीय एकात्मतेची भावना आणि सामाजिक बांधिलकी निर्माण होण्यास मदत होणार असल्याचेही मंत्री श्री. भुसे यांनी यावेळी नमूद केले. सुरूवातीला हा उपक्रम प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात येणार असून त्यानंतर राज्यात सर्व शाळांमध्ये राबविण्याबाबत सूचना देण्यात येणार आहेत. शालेय जीवनात देशसेवेचे बीज रोवण्याचा आणि सशक्त राष्ट्र घडवण्याचा महत्त्वाकांक्षी विचार आता प्रत्यक्षात उतरतो आहे, ही निश्चितच महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असल्याचेही यावेळी श्री.भुसे यांनी सांगितले. माजी सैनिकांचे अनुभव विद्यार्थ्यांसाठी अमूल्य मार्गदर्शन - माजी सैनिक कल्याण मंत्री शंभुराज देसाई सेवानिवृत्त सैनिकांकडे केवळ युद्धकलेचेच नाही, तर कठोर प्रशिक्षण, कठीण परिस्थितीशी लढण्याची मानसिकता, आणि सहकार्य यांसारख्या अनमोल कौशल्यांचा ठेवा असतो. हे सर्व गुण विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयुक्त ठरणार आहेत. हा उपक्रम केवळ शिक्षण क्षेत्रातच नव्हे, तर राष्ट्रनिर्मितीच्या दिशेने एक महत्वाचे पाऊल ठरणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच शिस्त, स्वाभिमान, आणि देशासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा यामुळे निर्माण होईल, असा विश्वास माजी सैनिक कल्याण मंत्री शंभुराज देसाई यांनी व्यक्त केला.

# जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाचे ललित गांधी यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ जिल्हा कार्यालयाचे उद्घाटन जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते झाले. त्यानंतर त्यांनी भगवान महावीर व मौलाना आझाद यांच्या प्रतिमेचे पूजन केले.

यावेळी श्री गांधी म्हणाले की, जैन महामंडळ व मौलाना आझाद महामंडळ मार्फत अल्पसंख्याक समाजाला याचा फायदा होणार आहे. कार्यालयाचा परिसर लहान असल्यामुळे लवकरच कार्यालयाचे स्थलांतर




करून देण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

बिराजदार यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे पुष्प गुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर महामंडळाच्या मार्फत शिक्षण कर्जाचा लाभ मिळालेल्या वालचंद इंजिनिअरिंग कॉलेज येथे शिकत असलेल्या प्रज्ञा सुरज कुमार आळंद विद्यार्थ्यांनीच स्वागत केले. या विद्यार्थिनींला अडीच लाख रुपयाचं शैक्षणिक कर्ज या कार्यालयामार्फत उपलब्ध करून देण्यात आले आहे.

यावेळी आर्थिक विकास महामंडळाचे सदस्य सिमभाई बुरान, ज्येष्ठ उद्योगपती केतन भाई शहा, विशाल मेहता, उपसरपंच मोडनिंब कल्पेश भाई शहा, रवींद्र गांधी, मनीष शहा, परवान बागवान, वाहिद मुजावर, सी.ए. बिराजदार आदी उपस्थित होते.

# वसुदेव सावंत आणि गायकवाड सर यांचा वाढदिवसानिमित्त सत्काराने अभिष्टचिंतन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : तालुक्यातील कन्हेरवाडी येथील माजी सरपंच तथा विद्यमान ग्रा.प.सदस्य वसुदेव सावंत आणि शिक्षक मल्हारी गायकवाड यांचा दि २५ मे रोजी संध्याकाळी त्यांच्या वाढदिवसानिमित्त लोकप्रतीनिधीसह ग्रामस्थांच्या वतीने शिवाजी चौक शिवनेरी हॉटेल येथे केक कापून त्यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करून त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला यावेळी श्री.शिवछत्रपती वाचनालयाचे संचालक प्रा.विलास जगताप सर, विवेकानंद मिटकरी सर,पत्रकार महेश मिटकरी,दयानंद



जगताप, दत्तात्रय शिंदे,मधुकर सावंत सर यांनी माजी सरपंच वसुदेव सावंत यांच्या विषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले यावेळी निवृत्त मेजर अनंत कवडे,चेअरमन चंद्रकांत जाधव,माजी चेअरमन माणिकराव मिटकरी,येडेश्वरी देवस्थान येरमाळा ट्रस्टचे अध्यक्ष बापूराव बेंद्रे,पत्रकार रामराजे वमन (जगताप),प्रा.फुलचंद सावंत,अंगद आगलावे, विठ्ठल धोंगडे,विकास कवडे,अंगद कवडे, तानाजी सावंत, विजयकुमार सावंत व इतर ग्रामस्थांसह राजकीय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परस्पर सहकार्यातून प्रगती शक्य : डॉ. अरुण तंगीराला

पंढरपूर- 'स्वेरीचा कॅम्पस, शैक्षणिक उपक्रम व येथील कल्चर पाहता ग्रामीण भागात एवढ्या मोठ्या प्रमाणात संशोधनाचे जाळे विणलेले पाहून विद्यार्थ्यांचे तंत्रज्ञानातील योगदान महत्वाचे ठरत असल्याचे जाणवते. परस्पर सहकार्यातून आणि समन्वयातून प्रगती शक्य होते. त्यामुळे संशोधनाच्या प्रगतीसाठी स्वेरी सोबत भविष्यात समन्वय साधून सहकार्य केले जाणार आहे.' असे प्रतिपादन इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नोलोजी, तिरुपतीचे अधिष्ठाता सीडीओ डॉ. अरुण तंगीराला यांनी केले.

## स्वेरीच्या संशोधन विभागाला दिली आयआयटी तिरुपतीच्या डॉ.अरुण तंगीराला यांनी सदिच्छा भेट

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नोलॉजी, तिरुपतीचे अधिष्ठाता सीडीओ डॉ. अरुण तंगीराला यांनी अलीकडेच सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी ते गौरवोद्गार काढत होते. संस्थेच्या वतीने त्यांचे प्रथम स्वागत करण्यात आले. '१९९८ साली स्वेरीने ग्रामीण भागात तंत्रशिक्षणाची मुहूर्तमेढ पंढरीच्या पायथ्याशी अर्थात गोपाळपूरमध्ये रोवली त्यामुळे पंढरीच्या शैक्षणिक वैभवात आणखी भर पडली असून अफाट परिश्रम घेत आज स्वेरीच्या बीजाचे रुपांतर वटवृक्षात झाले आहे. स्वेरीच्या सामाजिक, शैक्षणिक आणि संशोधन या महत्वाच्या मुद्यांवर बोलत असताना आयआयटीचे योगदान कोणत्या स्वरुपात विद्यार्थ्यांच्या हिताचे ठरेल यावर डिग्री इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्यासमवेत अधिष्ठाता सीडीओ डॉ. अरुण तंगीराला यांनी चर्चा केली. त्यातील ड्रोन सेंटर ऑफ एक्सलन्स ला भेट देऊन तेथील संशोधन व नवकल्पनांची पाहणी केली तसेच ड्रोन क्षेत्रातील प्रगती पाहून टीमच्या इनोव्हेशन कौशल्याचे विशेष कौतुक केले.







यावेळी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पल्स च्या माध्यमातून तांत्रिक सत्रे, उद्योग संपर्क, करिअर मार्गदर्शन, तसेच संशोधन व इनोव्हेशन क्षेत्रात नव्या संधी उपलब्ध करून देण्याचा दृष्टीकोन मांडण्यात आला. डॉ. तंगीराला यांच्या संवाद व कॅम्पस भेटीदरम्यान संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी विविध नवीन दृष्टिकोन समोर आले, ज्यामध्ये आयआयटी तिरुपती व आयआयटी एल्युमनी लीडरशिप सिरीज (पाल्स) या मंचासोबतच्या सहकार्याचे विशेष महत्त्व अधोरेखित झाले. या समवेत डॉ. तंगीराला यांनी अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासमवेत महाविद्यालयासोबतचे ऋणानुबंध कसे जपावेत याबद्धल चर्चा करून त्यांनी योग्य मार्गदर्शन केले. स्वेरीचे शिक्षण क्षेत्रातील योगदान जसजसे लक्षवेधी ठरत आहे तसतसे माळरानावरील या शैक्षणिक संकुलाला भेट देणाऱ्यांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. अशात कॅम्पसला आय आय.टी., तिरुपतीचे डॉ. अरुण तंगीराला यांनी सदिच्छा भेट दिली. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या दिशादर्शक प्रेरणेतून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी.एम. पवार व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली व संशोधन अधिष्ठाता डॉ. अमरजित केने यांच्या परिश्रमामुळे संशोधन विभागाला गती मिळत आहे. कॅम्पसमध्ये संशोधन कल्चर असल्यामुळे विद्यार्थ्यांचा कल देखील साहजिकच संशोधनाकडे अधिक असल्याचे विविध संशोधन प्रकल्प, संशोधनासाठी मिळालेला निधी, शिक्षण पद्धती, स्वेरीमधील इतर सुविधा या मधून जाणवते. त्या अनुषंगाने असलेले उपक्रम, इफेक्टिव्ह टीचिंग-लर्निंग स्कीम, नाईट स्टडी, महाविद्यालयाला मिळालेली विविध मानांकने, गेट व स्पर्धा परीक्षेची तयारी, प्लेसमेंटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी घेतलेली गरुड झेप, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी प्राणायम, आर्ट ऑफ लिव्हिंग सारखे प्रशिक्षण, विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यातील आदरयुक्त शिस्त व मिळत असलेले संस्कार, विविध शैक्षणिक, विधायक व सामाजिक उपक्रमांची माहिती जाणून घेतली. यावेळी पब्लिसिटी प्रोटोकॉल विभागाचे अधिष्ठाता डॉ. डी. एस. चौधरी व संशोधन विभागातील शिक्षक, ड्रोन प्रयोगशाळेचे कर्मचारी भाग्यश्री देशमुख, शिवभक्ती देशमुख, मारुती आसबे व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# बसस्थानकावरील चोरीचा छडा इंदापूर पोलिसांनी काही तासांतच लावत महिलेला लाखो रुपयाचे सोन्याचे दागिने व मोबाईल केला परत

## दमदार कामगिरी केल्याबद्दल छडा लावणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचे अभिनंदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर बसस्थानकावर घडलेली चोरीची घटना केवळ काही तासांत उघडकीस आली असून इंदापूर पोलिसांच्या सतर्कतेमुळे संबंधित महिलेला आपला मौल्यवान मुद्देमाल परत मिळाला.

इंदापूर बस स्थानकातून मनीषा बंडू बनसोडे व त्यांचे पती बंडू रामभाऊ बनसोडे, रा- पळसदेव (माळेवाडी-१) ता- इंदापूर, जि-पुणे, या वालचंदनगर ला जाणाऱ्या बस मध्ये बसण्यासाठी बस स्थानकात थांबल्या होत्या. त्यावेळी वालचंदनगर ला जाणारी बस लागली होती. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे बऱ्यापैकी प्रवासी एसटीने प्रवास करतात त्यामुळे वालचंदनगर ला जाणाऱ्या बस मध्ये चढताना गर्दी असल्याने मनीषा बनसोडे यांनी स्वतः जवळची पर्स थेट गाडीच्या सिटवरती टाकली होती. त्या पर्समध्ये दोन तोळ्याचे सोन्याचे मनी मंगळ-सूत्र व एक मोबाईल असा दोन लाख रुपयाचा ऐवज होता.

मनीषा बनसोडे या बस मध्ये चढल्यानंतर त्यांना त्यांची पर्स संबंधित सिट वरून गायब झाल्याची निदर्शनास येताच त्यांनी तात्काळ घाबरलेल्या अवस्थेत इंदापूर बस स्थानकात असलेल्या पोलीस मदत केंद्रात पोलीस अमलदार सचिन बोंबे यांना माहिती दिली. पोलीस आमलदार सचिन बोंबे यांनी संबंधित माहिती पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांना दिल्यानंतर पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांनी तात्काळ सूत्र हलवत इंदापूर पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाला कारवाईचे आदेश दिले.

तपासादरम्यान सदर बॅग बसमध्ये सापडली. या बॅगेत दोन तोळ्यांचं सोन्याचं गंठण आणि अंदाजे १५,००० रुपयांचा मोबाईल फोन होता. काही तासांतच संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करून इंदापूर पोलिसांनी तो संबंधित महिलेला सुपूर्त केला.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार प्रकाश माने, पोलीस हवालदार सलमान खान, पोलीस कॉन्स्टेबल अंकुश माने, पोलीस कॉन्स्टेबल विशाल चौधर, पोलीस कॉन्स्टेबल गणेश डेरे, पोलीस कॉन्स्टेबल तुषार चव्हाण, पोलीस कॉन्स्टेबल आरिफ सय्यद, पोलीस कॉन्स्टेबल सचिन बॉम्बे, महिला पोलीस कॉन्स्टेबल ज्योती विभुते, महिला पोलीस कॉन्स्टेबल स्वप्नाली साळवे यांनी केली.



# दिव्यांग लेखक मसाजी वाघमारे यांच्या 'यशाचे काटेरी बोचके' पुस्तकाचे प्रकाशन डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/वळसंग : एक प्रेरणादायी क्षण ठरलेल्या दिव्यांग लेखक मसाजी वाघमारे यांच्या यशाचे काटेरी बोचके या पुस्तकाचे प्रकाशन येथील स्वामी समर्थ विश्रामधामच्या सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडले. या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे माजी जिल्हाधिकारी डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.



या प्रसंगी शिवव्याख्याते शिवरत्न शेटे, राजश्री कलशेट्टी, माजी कृषी अधिकारी लक्ष्मण होटकर, सरपंच जगदीश अंटद, अध्यक्ष व माजी सरपंच श्रीशैल दुधगी, मुख्याध्यापक विरेश थळगे, संपादक धोंडप्पा नंदे, पत्रकार दिनकर नारायणकर, आणि लेखक मसाजी वाघमारे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी मुख्याध्यापक शिवशरण म्हेत्रे यांनी भूषवले.

शिवरत्न शेटे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, डॉ. कलशेट्टी यांनी एका तळागाळातील दिव्यांग व्यक्तीमध्ये लेखक शोधून काढला, त्याला प्रोत्साहन दिले, ही बाब खरा-खरच समाजासाठी प्रेरणादायी आहे. अशा प्रकारे नवोदित लेखक समाजासमोर येतील, ही अपेक्षा आहे.

मसाजी वाघमारे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, अनेक ठिकाणी विनंती करूनही कुणीही प्रकाशनासाठी पुढे आले नाही, ही खंत आहे. मात्र डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी मार्गदर्शन व आर्थिक सहकार्य केल्यामुळेच माझे पुस्तक प्रकाशित होऊ शकले. विशेषतः माझ्या आई साखराबाईचा झालेला सन्मान माझ्यासाठी मोठा आनंदाचा क्षण आहे.

कार्यक्रमाचे स्वागत व सूत्रसंचालन माजी सरपंच महादेव होटकर यांनी केले, तर प्रास्ताविक व आभार प्रदर्शन माजी मुख्याध्यापक सिद्धारूढ काळे यांनी केले.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे मतदार संघातील विविध समस्यांबाबत कारवाई करण्याची निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

मंगळवेढा शहर व तालुक्यात दिवसेंदिवस वैद्य दारू विक्री, जुगार, सट्टा ,गुटखा या,ासारख्या धंद्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत चाललेले आहे. या अवैद्य व्यवसायामुळे सामान्य जनतेला युवकांना आणि शाळकरी मुलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.



या गंभीर प्रश्नाबाबत मा. पोलीस निरीक्षक, मंगळवेढा पोलीस स्टेशन यांच्याकडे एक लेखी निवेदन दिले आहे. यात मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिणबहात बाहेरून येणाऱ्या अवैद्य गुटखा व दारू विक्रेत्यांवर तातडीने क*** कारवाई करण्याची मागणी केली.

मंगळा तालुक्यातील ग्रामीण भागा त एस. टी. बस सेवा अभाव प्रचंड आहे. शाळा, कॉलेज, क्लासेस साठी, मंगळवेढा शहरात येणाऱ्या विद्यार्थ्यांना दररोज प्रवास करताना अडचणीचा सामना करावा लागत आहे महिला जेष्ठ नागरिक आणि विद्यार्थी वर्गांसाठी वेळेवर निर्मिती एसटी सेवा उपलब्ध नसल्याने गावागावातून इजा करणे कठीण झाले आहे या प्रश्नाबाबत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या मंगळवेढा आगार व्यवस्थापक यांच्याकडे निवेदन दिले आहे त्यात खालील गोष्टींची मागणी करण्यात आली आहे.

तालुक्यातील नादुरुस्त व खराब बस तात्काळ दुरुस्त कराव्यात. प्रवासी नागरिकांची सुरक्षा आणि वेळेची बचत व्हावी यासाठी नव्या बस सुरू कराव्यात. विद्यार्थ्यांना वेळेवर शाळा व कॉलेजला पोहोचता यावे यासाठी विशेष बस फेऱ्या सुरू कराव्यात.

महिलांसाठी सुरक्षित व सुसज्ज एसटी सेवा उपलब्ध करून द्यावी. मंगळ शहरातील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना करावेत वीजपुरवठा खंडित न होण्यासाठी सबस्टेशन ट्रान्सफॉर्मर लाईन तपासणी आणि देखभाल नियमित करावी. शहरातील वीजपुरवठा खंडित होणार नाही याची प्रशासनाने खात्री द्यावी.

सध्या सगळ्या गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेता, प्रशासनाने या प्रकरणाबाबत तातडीने कठोर पावले उचलावीत अशी आग्रही मागणी आली. अन्यथा स्थानिक पातळीवर तीव्र स्वरूपाचे जन आंदोलन छडावी लागेल , असा इशाराही या सर्व निवेदनातून देण्यात आला आहे, यावेळी पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे सर, ,मा राहुल शहा, अनिल दादा सावंत, इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# शिवणी लख येथील अंकीता गायकवाड बारावीला ७७.१७% गुण घेऊन उत्तीर्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा/अमर जाधव : औसा तालुक्यातील लख शिवणी येथील बांधकाम मिस्त्री मजुर सर्वसामान्य कुटुंबातील बालाजी गायकवाड यांची कन्या अंकीता गायकवाड विद्यार्थीनीने बारावी परीक्षेत उज्वल यश संपादन करुन ७७.१७% गुण घेउन खरोसा येथील नवभारत माध्यमीक व उच्च माध्यमीक विद्यालयात पहीला येण्याचा बहुमान पटकावला ,आज अंकीता बालाजी गायकवाड यांचा परीवाराच्या वतिने पेढे भरउन आनंदोत्सव साजरा करण्यात आला ,अंकीता गायकवाड या विद्यार्थनिने अथक परीश्रम जिद्ध,चिकाटी व मेहनतीच्या जोरावर कुटलाही घरी शैक्षणिक वारसा नसताना स्वकर्तत्वाने अहोरात्र अभ्यास करुन शाळेत पहीला येण्याचा बहुमान मिळवत आपल्या मजुरी करणार्या आई वडीलांच्या कष्टाचे सोन केल व बारावीला शाळेत पहिला येण्याचा मान मिळवला.



अंकीता गायकवाड यांची घरची परिस्थीती अत्यंत प्रतिकुल असुन वडील बांधकाम मिस्त्री मजुरी करतात तर आई शेतात शेतमजुरी करते घरची परिस्थीती नसतानाही आपल्या लेकीला शिक्षण दयायचच मनुन हट्ट केला व अंकीता गायकवाड आई वडीलांनी आपल्या लेकीला मजूरी करुन शिकायला अर्थसहाय्य केल व लेकीने आपल्या मोलमजुरी करणार्या आई बापाच्या कष्टाचे सोन केल अंकीताच्या आई वडीलांना लेकीच कौतुक करतेवेळी आनंदाश्रु दाटुन आले ,यावेळी बारावीत यश संपादन केल्याने अंकीता गायकवाड हीचा सत्कार करत औक्षण करण्यात आले. यावेळी सोसायटीचे चेअरमन विठ्ठल शिंदे बालाजी गायकवाड, प्रभुगायकवाड, डिगंबर गायकवाड,लतीका गायकवाड, सुवर्णा गायकवाड, प्रियंका गायकवाड जयश्री गायकवाड मंगलबाई कांबळे ज्योती करतो रे शिवराय गायकवाड दयानंद गायकवाड प्रवीण गायकवाड अनिल गायकवाड सह मुख्याध्यापक स्वामी, कोळपे सर, सुरवसे सर, टीके सर, सह शिवणी लख ग्रामस्थांनी अंकीता गायकवाड विद्यार्थीनीचे अभिनंदन करुन पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# नवभारत विद्यालयाचा बारावीचा ९३ तर दहावीचा ८७ टक्के निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी, अमर जाधव : औसा तालुक्यातील खरोसा येथील महात्मा बसवेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित नवभारत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावी व बारावीचा निकाल लागला असून बारावी मध्ये गायकवाड अंकिता बालाजी ७७.१७% गुण घेऊन प्रथम आली असून खरोसा येथील दुर्गा शंकर शिंदे ७६.१७% घेऊन द्वितीय आली आहे,त्याचबरोबर दहावीचा निकालात प्रतीक्षा सुशेन चव्हाण विद्यार्थिनीने दहावी बोर्ड ला ९३.००% टक्के गुण घेऊन प्रथम आली असून अम्रता नेताजी जाधव ८९.२०% गुण घेऊन द्वितीय आली आहे. गेल्या किती वर्षापासून निकालाचे अविरत परंपरा राखत अनेक विद्यार्थी आपल्या संस्थेतून जास्तीत जास्त गुणांनी उत्तीर्ण करण्याचा संस्थेचा संकल्प आहे खरोसा येथील नवभारत माध्यमिक व उच्च माध्यमिक संस्थेची स्थापना १९५८ साली झाली असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी नवभारत विद्यालय एक पर्वणी असुन या शाळेतून संगीत अनेक विद्यार्थी डॉक्टर्स इंजिनिअर व विविध क्षेत्रात कार्यरत आहेत शाळेचे जास्तीत जास्त गुणवत्ता वाढीसाठी शाळेत ज्यादा तासिका घेतली जाते विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते त्यासोबतच संस्थेत शिक्षणाबरोबर विद्यार्थी व मुलींची सुरक्षेसाठी शाळा सि.सि.टि.व्ही ,बसवण्यात आले आहेत ,नवभारत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सुंस्क्रत अभ्यासु व उच्चविभुषीत शिक्षकांच्या अथक विद्यादानाने प्रत्येक वर्षी बारावी व दहावी ची १००% यशस्वी निकालाची परंपरा असुन खरोसा सह ग्रामिन भागातील परीसरातुन विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतात ,अनेक विद्यार्थी घडवण्यात मोलाच योगदान असलेली अग्रगण्य संस्था मनुनही नवभारत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाकडे पाहीले यावेळी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक परमेश्वर स्वामी, पर्यवेक्षक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करुन पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दील्या.




## मांस विक्री बंद न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

## दीपक भापकर यांनी पोलिस प्रशासनाला दिले निवेदन

# निफाडला मंदिर परिसरात मांस विक्री, नागरिकांचा संताप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड शहरा नजीक कुंदेवाडी रोडवर अनेक धार्मिक मंदिरे असून सकाळ-संध्याकाळ या ठिकाणी भावीक भक्तांची दर्शनासाठी वर्दळ असते ,परंतु याच परिसरात मटन, मच्छी, चिकन विक्रीची दुकाने असल्याने मंदिराच्या पावित्र्याला नष्ट केले जात आहे, या गोष्टीचा नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात असून ही मांस विक्रीची दुकाने मंदिर परिसरातून त्वरित बंद करण्यात यावी अन्यथा या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा दीपक भापकर यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

**निफाड येथील संत सेना महाराज मंदिर दत्त मंदिर आदि. धार्मिक स्थळां नजीक अवैद्य रित्या मांस विक्रीची दुकाने थाटली असून भाविकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जात आहे, परिसराचे पावित्र्य नष्ट होत असून या मंदिरांचे पवित्र आबादीत राहावे यासाठी नगरपंचायतने त्वरित कारवाई करावी अन्यथा या विरोधात तीव्र आंदोलन केले जाईल**

**– दीपक भापकर सामाजिक कार्यकर्ते निफाड**

निवेदनात पुढे म्हणतले आहे की निफाड पिंपळगाव या मुख्य रस्त्यावर निफाड शहराजवळ संत सेना महाराज मंदिर, दत्त मंदिर महानुभव पंथ, संगमेश्वर मंदिर, भद्रा मारुती मंदिर, व इतर ही धार्मिक स्थळे असून मंदिराच्या जवळ ५० ते ५०० मीटर अंतरावर मटन मच्छी चिकन आदींची विक्री केली जात आहे, त्यामुळे परिसरातील वातावरण हे दूषित होत असून या ठिकाणी माशा डास तसेच कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे यापासून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असून अनेक वाटसरुंना या कुत्र्यांनी चावा घेतला आहे ,अनेक ठिकाणी कुत्रे ही हाडे मांसाचे तुकडे खाऊन टाकतात, ही दृष्य कीळसवाने असून मंदिराच्या शांत व पवित्र वातावरणाला विसंगत आहे.







यामुळे भक्तांच्या धार्मिक भावना दुखावल्या जात आहे, स्थानिक नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून संताप व्यक्त केला जात आहे तरी मांसविक्रीच्या या युनिटची तपासणी करून तातडीने बंदी घालावी, मंदिर परिसरापासून किमान १००० मीटर अंतरावर असल्या व्यवसायावर नियंत्रण करावे, भविष्यातील अशा घटनांसाठी मार्गदर्शक नियम बनवावे, अशा मागण्या दीपक भापकर, सचिन गवळी, गणेश मंडलिक, शरद कुंदे, प्रशांत कुंदे, यांनी एका निवेदनाद्वारे केली असून निफाड नगरपंचायत व निफाड पोलीस ठाणे यांनाही निवेदनाची प्रत देण्यात आली आहे.

# १० हजारांच्या मुदत ठेवीच्या माध्यमातून राज्यातील १२ हजार पत्रकारांना २ लाखांचे विमा कवच!

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचा महत्वकांक्षी संकल्प; 'प्रतिबिंब प्रतिष्ठान'चे भव्य लोकार्पण आणि 'महाराष्ट्र महागौरव पुरस्कार २०२५' समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना, महाराष्ट्र यांच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या 'प्रतिबिंब प्रतिष्ठान' या सामाजिक उपक्रमाचे भव्य लोकार्पण आणि 'महाराष्ट्र महागौरव पुरस्कार २०२५' समारंभ रविवारी पुण्यातील JW Marriott हॉटेल येथे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रेरणादायी वातावरणात पार पडला. पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी नेहमीच कटिबद्ध आहे, अशी भावना यावेळी पाटील यांनी व्यक्त केली.

यावेळी मंत्री जयकुमार गोरे, आयुषमान भारत मिशनचे डॉ. ओमप्रकाश शेटे, एबीपी माझाच्या संपादिका सरिता कौशिक, मंत्रालय तथा विधीमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, डिजीटल मीडिया संघाचे राजा माने यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रतिबिंब प्रतिष्ठान संस्थेच्या ध्येयधोरणांची माहिती देण्यात आली आणि संस्थेच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. या विशेष समारंभात राज्यभरातून आलेल्या डिजिटल मीडिया क्षेत्रातील पत्रकार, संपादक, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर व्यक्तींना 'महाराष्ट्र महागौरव पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आला.

चंद्रकांतदादा पाटील यावेळी म्हणाले,डिजिटल माध्यमांनी माहितीचा प्रसार वेगवान व व्यापक केला आहे. मात्र, पत्रकारांच्या मागे उभं असलेलं कुटुंब त्याग करतं, हे विसरता कामा नये. अशा पार्श्वभूमीवर 'प्रतिबिंब प्रतिष्ठान' सारखी संस्था ही काळाची गरज आहे. पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी नेहमीच कटिबद्ध आहे , अशी भावना यावेळी पाटील यांनी व्यक्त केली. यावेळी पाटील यांनी प्रतिबिंब प्रतिष्ठान मार्फत राज्यातील १२००० पत्रकारांचा विमा काढण्यात येणार असल्याची घोषणा केली. ज्यामध्ये प्रत्येकाला २ लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले, आजचा पत्रकार केवळ माहिती पुरवणारा नाही, तर समाजमन घडवणारा प्रभावी घटक आहे. 'प्रतिबिंब प्रतिष्ठान' ही संस्था पत्रकारांच्या सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांच्या कुटुंबाचाही विचार करते, ही अत्यंत स्तुत्य बाब आहे.

जयकुमार गोरे यांनी सांगितले,पत्रकार समाज हा समाजाचे आरसे असतो. त्यांचे योगदान मोठे असूनही त्यांच्या कुटुंबाकडे फारसे लक्ष दिले जात नाही. 'प्रतिबिंब प्रतिष्ठान' ही संस्था या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. पत्रकारांच्या मुलांमध्ये आत्मविश्वास, मूल्यसंस्कार आणि स्पर्धात्मक क्षमतांचा विकास घडवण्यासाठी ही संस्था मोलाची भूमिका बजावेल.

संस्थेचे अध्यक्ष आणि कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक राजा माने यांनी सांगितले,पत्रकारिता ही केवळ माहिती पुरवण्याचे माध्यम नाही, ती समाजाचे प्रतिबिंब आहे. म्हणूनच संस्थेला 'प्रतिबिंब' हे नाव दिले आहे. पत्रकारांच्या मुलांसाठी एक सशक्त, सकारात्मक व्यासपीठ निर्माण करणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. पत्रकार कुटुंबांसाठी हे एक विश्वासार्ह आधार केंद्र ठरेल, याची आम्हाला खात्री असल्याचे ते म्हणाले.

पत्रकार कुटुंबांसाठी 'प्रतिबिंब प्रतिष्ठान'

पत्रकारांच्या मुला-मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी प्रतिबिंब प्रतिष्ठान ही संस्था स्थापन करण्यात आली आहे. पत्रकारांचे जीवन धकाधकीचे आणि तणावपूर्ण असल्याने त्यांच्या कुटुंबाकडे, विशेषतः मुलांकडे, वेळ देणे कठीण होते. या पार्श्वभूमीवर ही संस्था शिक्षण, आरोग्य, मानसिक स्वास्थ्य, मूल्यसंस्कार, कला-क्रीडा आणि करिअर मार्गदर्शन अशा विविध क्षेत्रांमध्ये उपयुक्त उपक्रम राबवणार आहे.

### पत्रकारिता पुरस्कार:

सरिता कौशिक – एबीपी माझा
- साहिल जोशी – मुंबई तक
- संजीव उन्हाळे – ज्येष्ठ पत्रकार
- भारत चव्हाण – लोकमत
- दिलीप सपाटे – मंत्रालय वार्ताहर संघ

### डिजिटल स्टार पुरस्कार:

- नितीन पाटील – पोलीसनामा
- अश्विनी जाधव – लोकमत डिजिटल
- अभिजीत दराडे – मटा डिजिटल
- विष्णू सानप – लेटसअप
- ओमकार वाबळे – मुंबई तक

**पुरस्कार विजेते – महाराष्ट्र महागौरव पुरस्कार २०२५ सामाजिक, शैक्षणिक, उद्योग आणि पत्रकारिता क्षेत्रातील पुरस्कारार्थी:**

डॉ. किरण सावे, पालघर – आदिवासी शिक्षण, बिग हिट मीडिया – अनुष्का सोलवट, ऋतिक मणी, अनिल मणी, सचिन वायकुळे, बार्शी – तृतीयपंथीय आणि देहविक्रय क्षेत्रातील महिलांसाठी कार्य, डॉ. पुरुषोत्तम धोंडगे, कंधार – शिक्षण व ग्रामविकास, उमाकांत मिटकर, नळदुर्ग – भटक्या-विमुक्त विकास, मोहन डांगरे, सोलापूर – महिला सक्षमीकरण, प्रशांत मोरे, महाबळेश्वर – युवा उद्योजक, संजय कोठारी, जामखेड – सामाजिक कार्य, नामदेवराव खराडे – साखर उद्योग, स्वप्निल परदेशी – चिक्की उद्योग, विजय राऊत – शिक्षण, क्रीडा, साहित्य, संदीप शिंदे – बेघर मनोरुग्ण पुनर्वसन, शिवराम घोडके – प्रगत शेती, आतिश शिरसाट – बेवारस मनोरुग्ण पुनर्वसन, भास्कर घुले – श्री विघ्नहर साखर कारखाना, संतोष ठोंबरे – ग्रामविकास,




मानसिंगराव चव्हाण – सहकारी साखर उद्योग, शुभम पसारकर – दिव्यवंदना आधार फाउंडेशन

यावेळी डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना, महाराष्ट्र यांच्या संयोजन समितीतील सदस्य,पदाधिकारी सतीश सावंत, महेश कुगांवकर, नंदकुमार सुतार, केतन महामुनी, शामल खैरनार, राजू वाघमारे, विकास भोसले, तेजस राऊत, इक्बाल शेख, दिपक नलावडे, अमोल पाटील, अजिंक्य स्वामी, गणेश हुबे, प्रशांत साळुंके यांची देखील उपस्थिती होती.

महाराष्ट्र शासन

**औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट, जि. सोलापूर.**

म्हाडा कॉलनी जवळ, स्टेशन रोड, अक्कलकोट.

e-mail : itisoakt@yahoo.com websire http://www.dvet.gov.in

Industrial Training Institute

**या संस्थेत प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५ करीता खालील व्यवसायामध्ये ONLINE पध्दतीने प्रवेश सुरु**

**प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५**

| अ.क्र. | व्यवसाय (ट्रेड) चे नाव | कालावधी | किमान शैक्षणिक पात्रता | उपलब्ध जागा |
|---|---|---|---|---|
| १. | ड्रेसमेकींग | १ वर्ष | SSC पास/नापास | 20 |
| २. | संधाता (वेल्डर) | १ वर्ष | SSC पास/नापास | 40 |
| ३. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | १ वर्ष | SSC पास | 20 |
| ४. | जोडारी (फिटर) | २ वर्ष | SSC पास | 20 |
| ५. | वीजतंत्री (ईलेक्ट्रीशयन) | २ वर्ष | SSC पास | 40 |
| | | | एकुण जागा | 140 |

*** वैशिष्ट्ये ***

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रवेश गुणवत्तेवर व शासकीय नियमा नुसार दिले जातील. | ८. | परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर अखिल भारतीय स्तरावरचे प्रमाणपत्र |
| २. | सुसज्ज प्रशासकीय इमारत व कार्यशाळा. | ९. | अनुभवी व तंत्र निदेशक वर्ग |
| ३. | रोजगार/नोकरीची खात्री देणारे प्रशिक्षण. | १०. | प्रात्यक्षिकावर आधारित प्रशिक्षण |
| ४. | पात्र प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन. दरमहा ५००/- रुपये ८०% उपस्थिती अनिवार्य | ११. | एस.टी पासची सोय |
| ५. | ग्रंथालय सुविधा, सुसज्ज AVTS Room, Computer Lab. | १२. | अद्यायावत वसतीगृह सुविधा |
| ६. | सर्व प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवारांना कंपनी मधुन अप्रेंटिशीपची संधी | १३. | निसर्ग रम्य वातावरण |
| ७. | तंत्रनिकेतनास ( Diploma) थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश (अटी लागू) | १४. | ८०% उपस्थिती आवश्यक |

*** प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे ***

| अ.क्र. | प्रवेश तपशिल | प्रवेशासाठी आवश्यक मुळ कागदपत्रे |
|---|---|---|
| १) | अनुसूचित जाती (SC) प्रवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र |
| २) | अनुसूचित जमाती (ST) प्रवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र |
| ३) | विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्ग (VJNT-1, NT-2, NT-3) | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र) |
| ४) | इतर मागास प्रवर्ग (OBC) विशेष मागास प्रवर्ग (SBC) | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र) |
| ५) | अपंग, तांत्रिक, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, बोस्टर स्कूल | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, व संबंधीत EWS प्रमाणपत्र |
| ६) | अन्य (OPEN) संवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला |
| ७) | इतर प्रमाणपत्र | NCC, MCC, जिल्हास्तर/राज्यस्तर/राष्ट्रीय क्रिडा स्पर्धा प्रमाणपत्र/रहीवाशी दाखला/ तीन फोटो/आधार कार्ड, राष्ट्रीयकृत बँक पास बुक झेरॉक्स, |

* आपले प्रवेश अर्ज विहीत मुदतीत https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळा वरुन ऑनलाईन सादर करावे.
* प्रवेश माहिती पुस्तिका ही https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
* प्रवेश प्रक्रिया ही प्रवेश नियमावलीतील भाग १ व भाग २ दोन नुसार होईल.
प्रवेश प्रक्रिया शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी चालू राहील.
*

*** महत्वाची सुचना ***

१) ऑनलाईन प्रवेश भरल्यानंतर उमेदवारांना मिळालेला युजर आयडी व पासवर्ड जतन व नोंद करुन ठेवावा. पुढील प्रवेश प्रक्रियेच्या सर्व टप्पयावर अंतिम प्रमाणपत्र मिळेपर्यंत तो आवश्यक आहे.
२) ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर विहीत शुल्क भरावे.
३) अर्ज निश्चितीसाठी (Confirmation) जवळच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस भेट द्यावी. अर्ज निश्चित झाल्या शिवाय विकल्प (Option) दिसणार नाही.
४) अर्ज निश्चितीची पावती व निश्चित केलेल्या अर्जाची प्रत प्राप्त करुन घ्यावी व प्रवेश फेरीच्या वेळी संस्थेत सादर करावी.
५) अर्ज निश्चिती करताना भरलेल्या अर्जाची एक प्रत व सर्व आवश्यक कागदपत्राची झेराक्स प्रत जोडावी. तसेच आवश्यक तेवढ्या प्रती काढून स्वतः जवळ ठेवाव्यात.
६) उमेदवाराने आपला अर्ज भरताना स्वःताचा किंवा आपल्या कुंटुबातील सदस्याचा चालू असलेला मोबाईल क्रमांक व आपला ई-मेल आयडी बिनचूक पणे नोंदवावा. प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत दिलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी, बदलू नये. नोंदविलेला मोबाईल क्रमांक आपल्या आधार कार्डशी व बँक खात्याशी जोडलेला असणे आवश्यक आहे. त्या शिवाय SID पोर्टलवर आपला PRN जनरेट होणार नाही.
७) निश्चित झालेल्या अर्जाची (Confirmed Application) प्रत व शुल्क भरल्याची पावती जपून ठेवावी.
८) प्रशिक्षणार्थ्याने प्रशिक्षण अर्धवट सोडल्यास पुर्ण प्रशिक्षण शुल्क वसुल करण्यात येईल.
९) प्रवेशाच्या वेळी सर्व मुळ कागदपत्रे व तीन झेरॉक्स सेट सोबत आणावे.
१०) प्रवेश निश्चित झाले नंतर जमा केलेले प्रशिक्षण शुल्क व अनामत रक्कम परत मिळणार नाही.
११) ऑनलाइन स्वरुपात शुल्क स्वीकारले जाणार नाही.

*** प्रवेशित उमेदवारांना खालील प्रमाणे शुल्क रोखीने भरावे लागेल. ***

| अ.क्र. | व्यवसायाचे नाव | कालावधी | खुल्या गटा करीता वार्षिक शुल्क रुपये (Open) | (Open) Total Rs. | मागासवर्गीया करीता वार्षीक शुल्क रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | वीजतंत्री (इलेक्ट्रीशयन) | 02 वर्षे | 2 वर्षे प्रशिक्षण शुल्क 2000+600 अनामत + 50 ओळखपत्र +200 ग्रंथालय +200 सांस्कृतिक कार्य +200 इंटरनेट | 02 वर्षे 3250/- | 02 वर्षे 1250/- |
| 2. | जोडारी (फिटर) | 02 वर्षे | 2 वर्षे प्रशिक्षण शुल्क 2400+600 अनामत + 50 ओळखपत्र +200 ग्रंथालय +200 सांस्कृतिक कार्य +200 इंटरनेट | 02 वर्षे 3650/- | 02 वर्षे 1250/- |
| 3. | वेल्डर (संधाता) | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 1200+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 2150/- | 01 वर्षे 950/- |
| 4. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 1000+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 1950/- | 01 वर्षे 950/- |
| 5. | ड्रेसमेकींग | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 800+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 1750/- | 01 वर्षे 950/- |
| 6. | वसतिगृह | | अनामत 1000/वार्षिक शुल्क 1200 | 2200/- | 2200/- |

टीप :
प्रवेशाच्या सविस्तर माहिती साठी संस्थेत प्रत्येक्ष संपर्क साधावा.

प्राचार्य
औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट
जिल्हा सोलापूर.

## सावे येथे अवैध वाळू चोरी; ३ लाख ५७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला / प्रतिनिधी

बेकायदेशीरपणे वाळूची चोरी प्रकरणी सांगोला पोलीसांनी एकावर कारवाई करत ३ लाख ५७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची घटना २८ मे २०२५ रोजी रात्री १ वाजणेचे सुमारास सावे ता.सांगोला येथे घडली. पो.काँ सद्दाम नदाफ यांनी सांगोला पोलीस स्टेशनला दिली आहे.

पोलीसांनी ३ लाख ५० हजार रुपये किंमतीचा विना नंबरचा ट्रॅक्टर ट्रॉलीसह व ७ हजार रुपये किमतीची ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये अंदाजे एक ब्रास वाळु असा एकूण ३ लाख ५७ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीसांनी सुनिल सिध्देश्वर खांडेकर (वय २२ वर्षे, रा. सावे ता. सांगोला) याचेवर बी. एन. एस कलम ३०३ (२), सह पर्यावरण संरक्षण अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पो.हे.काँ बनसोडे हे करीत असल्याची माहिती सांगोला पोलीस ठाण्याकडून मिळाली आहे.

## जेजुरी येथे भेसळयुक्त खवा व पेढे तयार करणाऱ्यासह विक्रेत्यांवर कारवाई करा : अविनाश भालेराव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/तिनिधी : पुरंदर - अखंड महाराष्ट्राचे कुलदैवत श्रीक्षेत्र जेजुरी येथे, संपूर्ण महाराष्ट्रातुन मोठ्या प्रमाणात भावी - भक्त आपल्या कुल दैवतांच्या दर्शनासाठी येत असतात, त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात खव्याची व पेढ्याचा विक्री होते, या ठिकाणी विक्री होत असलेला खवा व पेढे केमिकल मिश्रीत दुधापासून बनविलेले जात आहे, अशी नागरीकांचे म्हणने आहे, त्यामुळे जेजुरी येथे खवा तयार करणा-या कारखान्याची चौकशी करुन दोषी व्यक्तीवर व भेसळयुक्त खवा व पेढे विक्रेत्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी लेखी मागणी जेजुरी नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे सामाजिक



न्याय सेलचे तालुका अध्यक्ष अविनाश भालेराव यांनी, सह आयुक्त अन्न व औषध प्रशासन विभाग पुणे यांच्याकडे केली आहे.

याबाबत त्यांनी सह आयुक्त अन्न व औषध प्रशासन विभाग पुणे यांना दिलेल्या निवेदनाच्या प्रति, राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री , जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगोले, जेजुरी देवस्थान ट्रस्ट यांना दिल्या आहेत, अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जेजुरी येथे खवा व पेढे विक्री करणारी जवळपास ३०० दुकाने महाद्वार मार्गावर आहेत, खवा व पेढे हे केमिकल युक्त दुधापासून बनविले जातात, अशा तक्रारी दर्शनासाठी येणाऱ्या भावी- भक्तांच्या आहेत, या जेजुरी येथे वर्षभरात असलेल्या आठ मुख्य यात्रा व रविवार यावेळी भावी- भक्त मोठ्या संख्येने खंडेरायाच्या दर्शनासाठी येत असतात. यावेळी मोठ्या प्रमाणात खवा व पेढ्याची विक्री केले जाते त्यामुळे या भेसळयुक्त खवा व पेढे ज्या ठिकाणी तयार केले जातात त्या कारखान्यांची व खवा पेढे याची तपासणी करुन, संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अविनाश भालेराव यांनी केली आहे.

### लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव यांच्या पथकाने २ हजार रुपये घेताना रंगेहाथ पकडले

# दोन हजारांची लाच घेताना भुमी अभिलेख कार्यालयातील लिपीक अटकेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : धाराशिव जिल्ह्यातील तालुका वाशी भूमी अभिलेख कार्यालयात कार्यरत असलेले आवक-जावक लिपिक दिगंबर मारुती ढोले, वय ४५, मूळ रा. हदगाव, ता. पाथरी, जि. परभणी याला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव यांच्या पथकाने दोन हजार रुपये लाच घेताना आज दिनांक २७ मे रोजी रंगेहाथ पकडले ५५ वर्षीय तक्रारदार यांची आई यांच्या नावे असलेल्या गट क्र. ४४४ या शेतजमिनीची मोजणी आणि हद्द कायम करण्यासाठी त्यांनी उपअधीक्षक,भूमी अभिलेख कार्यालय,वाशी येथे अर्ज दिला होता. दिनांक ०७ मे २०२५ रोजी या जमिनीची मोजणी लिपिक दिगंबर ढोले यांनी केली होती यानंतर त्यांनी शेतजमिनीच्या हद्द कायम खुणा करण्यासाठी तक्रारदाराकडे तीन हजार रुपयांची लाच मागितली याबाबत तक्रारदाराने दि. २३



मे २०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,धाराशिव कार्यालयात तक्रार दाखल केली तक्रारीची पडताळणी २६ मे रोजी पंचासमक्ष करण्यात आली असता आरोपीने खरोखरच लाचेची मागणी करत असल्याचे स्पष्ट झाले. तडजोडी नंतर आरोपीने दोन हजार रुपये घेण्यास तयार असल्याचे सांगितले लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धाराशिव यांनी तात्काळ सापळा रचला दिनांक २७ मे २०२५ रोजी तक्रारदाराकडून पंचासमक्ष दोन हजार रुपये लाच रक्कम स्वीकारताना आरोपी दिगंबर ढोले याला रंगेहाथ अटक करण्यात आली तसेच आरोपी कडुन रोकड दोन हजार रुपये लाच रक्कम,ओप्पो कंपनीचा मोबाईल फोन जप्त करण्यात आला आहे सध्या आरोपीची घरझडती सुरू असून मोबाईलमधील डेटा तपासणीसाठी ताब्यात घेण्यात आला आहे याप्रकरणी आरोपीविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती हि कारवाई विकास राठोड पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धाराशिव, सिद्धाराम म्हेत्रे पोलीस उपअधीक्षक लाचलुचपत विभाग धाराशिव,संदीप आटोळे पोलीस अधीक्षक ला.प्र.वि. छ.संभाजी नगर,मुकुंद आघाव अपर पोलीस अधीक्षक ला.प्र.वि. छ. संभाजी नगर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली पो.अं.आशिष पाटील, विशाल डोके, जाकेर काझी व चालक पो.ना.दत्तात्रय करडे यांनी सापळा रचून आरोपीला अटक करण्यात आली. सरकारी कार्यालयांमध्ये कोणीही लाच मागत असल्यास तक्रार करण्यासाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा टोल फ्री क्रमांक. १०६४,पोलीस अधीक्षक ला.प्र.वि. छ.संभाजी नगर ९९२३०२३३६१, पोलीस उपअधीक्षक धाराशिव ९५९४६५८६८६ असे आवाहन करण्यात आले आहे.